


Scanned with CamScanner

कोट. वि. अप्पर तहसिलदार गैरकृषी कर आकारणी क्र. ५, नागपूर यांचे न्यायालय, नागपूर.

रा.मा.क्र. १११५/ एन.ए.पी.३४/२०१६-१७
मौजा :- बोरगाव

आदेश

१. श्री/श्रीमती. SIRISHKUMAR HARILAL CHOTLIYA AND OTHER

रा. नागपूर यांनी, **गोकुल हाऊसिंग सोसायटी** (सहकारी संस्था किंवा ज्या व्यक्तीने विक्री करुन दिली असेल त्यांचे नाव नमूद करावे) **मौजा. बोरगाव, भुखंड क्रं. ३९ ख.नं./सर्वे नं. ७२/१, ७३/२, ७६/१, ७७, ७८/१, ८१, ८२,** जागा निवासी प्रयोजनासाठी **दि. १८/०४/१९९०** च्या नोंदणीकृत विक्रीपत्राद्वारे खरेदी केली व सदर भुखंडावर अकृषिक आकारणी नियमित करण्यास्तव अर्ज सादर केला, यावरुन सदर प्रकरण पंजिबध्द करण्यात आले.

२. ज्याअर्थी अर्जदाराने कृषीक जमीनीचा अकृषीक उपयोग करण्यासाठी म.ज. म.अ. १९६६ चे कलम ४४ अन्वये आवश्यक असलेली महसूल विभागाची परवानगी न घेता अकृषिक उपयोग सुरु केला, त्या अर्थी ते वरील अधिनियमाचे कलम ४५ व त्या खालील निदेशान्वये दंडात्मक कार्यवाहीस पात्र आहेत.

३. नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी ५७२/१९०० अनधिकृत ले-आऊट मंजुरी करीता धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे. सदर भुखंड हा ५७२/१९०० अनधिकृत ले-आऊट मध्ये अंतर्भुत असल्याचे सांगतात. त्यामुळे अधिनियमाचे कलम ४५ अ अन्वये परावर्तीत कर आणि महा. जमीन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ चे नियम ८ अन्वये दंडाची आकारणी करण्यात आली.

४. मा. जिल्हाधिकारी नागपूर यांनी मला प्रदान केलेल्या अधिकारात व उपरोक्त कायद्याचे अंतर्गत अप्पर तहसिलदार (गैरकृषी) खालील प्रमाणे कर आकारणी करीत आहे. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शा.नि.क्र.एन. ए. ए. ४९८१ / २४२५३ – ब – २, दि. ३ जुलै १९८१ अन्वये दि. १.८.१९७९ पासुन व शा. नि. क्रं. एन. ए. ए.-१०८७ / ३५७० / प्र.क्र. ५३ / ल ५ दि. २७/०९/२००१ मधील तरतूदीनुसार दि. ०१/०८/२००१ पासुन निर्धारित प्रमाण दराने सदर भुखंडाची अकृषिक आकारणी **मौजा बोरगाव** येथील प्रति चौरस मिटर. **०.३१३, १.८७८ रू. पैसे** प्रमाणे **८८४.८३४० चौ. मी. क्षेत्रफळाचे रू. १६५४/-** वार्षिक आकारणी निश्चित करण्यात येत आहे. सदर भुखंड / ले-आऊट हे सन १९९० **पासुन** गैरकृषी निवासी उपयोगात येत असल्यामुळे **सन १९९० पासुन** ते सन २०१६-१७ पर्यत एकुण २५ वर्षाची आकारणी **रू. ६६१६०/-** आकारण्यात आली. त्याप्रमाणे वरील रक्कम शासकीय **चा. क्र. / जिआरएन एमएच ०० ५२६४३३५ २०१६१७ एम दिनांक १७.१०.२०१६** अन्वये वसुल करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, नागपूर सुधार प्रन्यास ने भूखंड महाराष्ट्र गुंटेवारी विकास (नियमाधिन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अन्वये उपरोक्त अभिन्यास / भूखंड नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे व विकास शुल्क भरुण घेतले आहे. त्या अर्थी सदर अधिनियमाचे कलम ५ नूसार सदरचा भूखंड अकृषिक उपयोगात आल्याचे मानण्यात येऊन त्यास नागपूर सुधार प्रन्यासचे नियमितीकरण पत्रातील अटीनूसार व शर्ती तसेच उपरोक्त महसूल अधिनियमातील तरतूदीस अधिन राहून वरील प्रमाणे अकृषिक आकारणी कायम करण्यात येत आहे.

हा आदेश माझे सही व कार्यालयीन शिक्क्यानिशी आज १७ .१०.२०१६ रोजी पारीत करण्यात येत आहे. गैर अर्जदारास या आदेशाविरुध्द अपील करण्याची मुभा आहे.

प्रतिलीपी :-

१. **तलाठी सा.क्र. ३९** नागपूर यांना पुढील कार्यवाहीस अग्रेशीत. त्यानी गाव न. २ ला वार्शिक आकारणीची नोंद घेऊन तशी नियीमत मागणी वसुली करावी.

२. **भुमापन अधिकारी क्र.** .....

अप्पर तहसिलदार
गैरकृषी कर आकारणी क्र.५
नागपूर

Scanned with CamScanner